❋ प्रकरण ६ वे ❋

# समारोप

## ❋ प्रकरण सहावे ❋

# समारोप

प्रबंधिकेच्या या प्रकरणाला समारोप नाव दिले असले तरी या प्रकरणात आपणास ग्रेस यांच्या कवितांबद्दल, त्यांच्या काव्यनिर्मितीबद्दल, काव्यपरंपरेबद्दल विचार मांडायचे आहेत. त्यांची काव्यविषयक जाणीव, काव्यपरंपरा याविषयी मते मांडायची आहेत.

ग्रेस यांच्या कवितांचे स्वरूप आकलन करून घेताना मानसशास्त्रीय सिद्धांतांचे आधार घेवून त्यांचा अभ्यास करावयाचा आहे.

ग्रेस यांचा वाङ:मयीन संप्रदाय किंवा वा ङमयीन वृत्ती कोणती आहे हे शोधून त्यांचा वाङमयीन संप्रदाय निश्चित करावयाचा आहे.

एखाद्या कवीचा वाङमयप्रवास कोठून सुरू झाला आणि त्यात कशी व कोणकोणती वळणे आली याचा आलेख मांडताना सुध्दा त्यात सुसंगती असेलच असे नाही. त्यात वृत्तीचा उदा. अभिजातवाद, सौंदर्यवाद, वास्तववाद, विचारांचा उदा. मार्क्सवाद, समाजवाद इ., जीवनदृष्टीचा उदा. मूल्यनिष्ठा, ध्येयनिष्ठा, देशप्रेम, अध्यात्म, ईश्वरनिष्ठा इ. यांचा आढावा घेता येतो. कवीची आत्मनिष्ठा, समाजाभिमुखता, जीवनाभिमुखता, प्रेमनिष्ठा, कर्तव्यनिष्ठा इ. चे अनुषंग तपासून घेता येतात. त्याच्या जीवनानुभवाची व्याप्ती, आवाका, प्रत आणि प्रकार समजून घेता येतात. ग्रेस यांच्या कवितांचा अभ्यास करताना या सर्वांचा विचार केला आहेच. त्यातून जे काही ठळकपणे जाणवले त्याचा हा ऊहापोह या प्रकरणात केला आहे.

ग्रेस हे स्वत:ला अनुवंशहीन कवी मानतात. त्यासाठी ते पुन्हा पुन्हा आग्रहाने 'वंशविषयक' विचार मांडतात. पण तरीही ते जेव्हा 'सहोदरां'ची संकल्पना मांडतात तेव्हा त्यांच्या स्वत:ला अनुवंशहीन समजण्याच्या विचारात विसंगती आढळते. ग्रेस यांची कविता वेगळी आहे हे निश्चितच. पण केवळ 'पृथगात्म' असणे म्हणजे वाङ्मयीन अनुवंश नसणे अथवा नाकारणे असे नव्हे.

माझी वाङ्मयनिर्मिती 'अनुवंशहीन' आहे असे म्हणताना ते स्वत:ची कोणतीच परंपरा सांगत नाही. समीक्षकांनी, वाचकांनी ग्रेस यांना कोणत्याही संप्रदायात

समाविष्ट केलेले आवडत नसावे. पटत नसावे. म्हणूनच त्यांना रेग, दि. पु. चित्रे यांच्या काव्यपरंपरेत बसणे अमान्य आहे. पण ते ज्ञानेश्वर, तुकाराम, टागोर, रिल्के, ब्रांते वगैरेंच्या वाङ्मयाबद्दल आदराने बोलतात. पण त्याचवेळी त्यांच्या वाङ्तयाला 'प्रार्थना' म्हणून त्या त्यांनी अर्धवट सोडल्या असाव्यात असे ग्रेस यांना वाटते. आणि त्या अर्धवट राहिलेल्या प्रार्थना ग्रेस पूर्ण करतात असेही ते म्हणतात. त्याचा संदर्भ पुढीलप्रमाणे -

''माझ्या सहोदरांनी अशा अर्धवट सोडलेल्या प्रार्थनांची जबाबदारी कोणीही माझ्यावर टाकलेली नाही. पण जिथे जिथे त्यांनी हे अनुभवखंड अविश्रांत सोडले त्या स्थळांपासून मला अनेकदा माझ्या प्रतिभेचे आदेश मिळत जातात. उदाहरणार्थ गीतांजलीतील टागोरांची ही कविता''.[१]

ग्रेस यांच्या या वक्तव्यावरून त्यांना नेमके काय म्हणायचे आहे ते सूचित होते आहे. म्हणजे ग्रेस स्वत:ला ज्ञानेश्वर, तुकाराम, टागोर इत्यादींच्या दर्जाचे आणि परंपरेतील कवी समजतात असे वाटते. तुकारामांच्या अभंगाबद्दल ते एका कवितेत म्हणतात,

प्राणांचे मोल देऊन मुक्ती विकत घेत
असतो मी; देहूच्या बाजारात अभंग
विकणाऱ्या तुकारामाप्रमाणे.

(सं. क., 'स्वप्न', पृष्ठ ५३).

या ओळींतून प्राणांचे मोल देऊन मुक्ती विकत घेणे इथपर्यंत आशय कळतो. वाचकांना या ओळी सुसह्य होतात. 'देहूच्या बाजारात अभंग विकणाऱ्या तुकारामांप्रमाणे' या ओळी असह्य होतात. कारण तुकारामांच्या काव्यनिर्मितीची प्रेरणा 'देहूच्या बाजारात अभंग विकणे' ही कधीच नव्हती. ग्रेस यांच्या अशा धक्कादायक व विसंगत काव्य ओळींनी वाचक गोंधळून जातात. ग्रेसविषयी अनेक प्रश्नचिन्हांकित गैरसमजुती निर्माण होतात. वर उल्लेखलेल्या तुकारामांच्या अभंगविक्रीविषयीही असेच होते, तुकारामांच्यावर 'आकांताचे देणे' हा ललित निबंध 'चर्चबेल'मध्ये लिहिणाऱ्या ग्रेस यांना तुकारामांच्या जीवनसृष्टीची, भक्तीमार्गातील अनुतापाची, त्यांच्या जीवनसंघर्षाची, अभंगांच्या उत्स्फूर्ततेची आणि काव्यजाणीवेची कल्पना निश्चितच असली पाहिजे असे असूनही ग्रेस यांनी 'देहूच्या बाजारात अभंग विकणाऱ्या तुकारामाप्रमाणे', असे म्हणणे धाडसाचे तितकेच अनुदाराचे वाटते. त्याचा निषेध वाचकांकडून होणार हे स्वाभाविक आहे.

ग्रेस यांना स्वत:चा 'संप्रदाय' निर्माण होतोय असे वाटत आहे. त्याचबरोबर तो होत नाही असेही वाटते. कारण जेंव्हा त्यांच्या कवितेसारखी कविता करण्याचा प्रयत्न नवकवी करतात तेव्हा ग्रेस यांना ती त्यांच्या कवितेची 'भ्रष्ट नक्कल' वाटते. म्हणूनच त्यांना संप्रदाय मान्य नाही. पण त्याचवेळी 'कलावंताचे नेतृत्व' त्याची कलाकृती करते, असे म्हणताना नेतृत्वाबरोबर येणारे 'शिष्यत्व' त्यांना अमान्य असावे असे वाटते.

ग्रेस यांच्या कवितेचा अभ्यास करताना लक्षात येते ती त्यांची 'दु:खजाणीव'. दु:खाचे अनेक प्रकार व्यक्तिसापेक्ष कमी-अधिक तीव्रतेचे असतात. पण ग्रेस यांची 'दु:खजाणीव' ही अनाकलनीय आहे. नेमके कशाचे दु:ख कवीला आहे हे उमगत नाही. कारण शेवटपर्यंत कवी या दु:खाचा ठावठिकाणा लागू देत नाही. शिवाय कवी दु:खाबद्दल तक्रार न करता त्याला एक शिस्त मागतो. या संदर्भात त्र्यं. वि. सरदेशमुख म्हणतात, ''ग्रेस यांना दु:ख हे असे अनुकूल संवेदनीय कसे ? याचा शोध घेता मला आढळून आले की, दु:खप्रत्यय हा ज्याचा एक अनिवार्य परिणाम आहे त्या प्रेमासंबंधी बोलताना ग्रेस दु:ख हा शब्द योजतात. 'संध्याकाळच्या कविता' मध्ये प्रेम/प्रीती हा शब्द कोठेही येत नाही. हे केवढे आश्चर्य ! ग्रेस यांना प्रेमाविषयी काहीही लिहायचे नाही काय !''[२] म्हणजे सरदेशमुखांच्या मते ग्रेस यांच्या लेखी प्रेम म्हणजे दु:ख असल्याने त्यांना दु:खसंवेदना प्रिय असावी. दु:खासंदर्भात ग्रेस म्हणतात, ''दु:ख'' सार्वभौम असते. ते कसे सोसावे अन् स्वीकारावे यांच्या पद्धती व्यक्तिगणिक भिन्न असतात पण तरीही दु:ख हे दु:खच राहते. दु:खाइतकी संपूर्ण अव्याभिचारी निष्ठा जगात दुसरी सापडणे नाही. मग अस्सल कवीने तरी या निष्ठेची कदर करायला नको का ?

दर्द का हदसे गुजरना है दर्द का दवा हो जाना।

दु:ख जर आपल्याशी निष्ठावंत असले तर आपणही त्यांच्याशी एकनिष्ठ असले पाहिजे''[३] ग्रेस यांना दु:खाबद्दल वाटणारी निष्ठा त्यांची दु:खप्रीती दर्शविते. 'दु:खावर प्रेम करणारा कवी' असे बालकवींना म्हटले जाते. तसेच सौंदर्यवादी वाङ्तयीन वृत्ती मध्येही 'दु:खाविषयी प्रीती' हे लक्षण आहे. ग्रेस यांची दु:खप्रीती पाहता ते सौंदर्यवादी कवी आहेत त्याबद्दल दुमत नसावे. तसेच ग्रेस यांची आत्मनिष्ठा, आत्ममग्नता ही त्यांना सौंदर्यवादी संप्रदायात समाविष्ट करते.

ग्रेस यांच्या कवितेतील निसर्ग, त्याचे कवितेतील अटळ अस्तित्व या बाबी ही त्यांच्यावरील सौंदर्यवादाचा प्रभाव दर्शवितात.

- निसर्गाचे साहचर्य.
- निसर्गावर मानवी भावभावनांचा आरोप.
- स्वप्नरंजनता.
- भास-आभासाच्या पातळीवर मनाला लागणारी हुरहुर.
- अज्ञाताची ओढ, गूढता.
- सौंदर्याचे पूजन.

ही सर्व सौंदर्यवादाची लक्षणे ग्रेस यांच्या कवितेतून स्पष्टपणे दिसून येतात. म्हणूनच ग्रेस सौंदर्यवादी कवी आहेत.

स्वत:च्या कवितेतील जटिलतेबद्दल, दुर्बोधतेबद्दल ग्रेस बोलताना त्यातून वाचकांच्याबद्दल एक प्रकारची बेफिकीरता जाणवते. उदा. चिमणीच्या जाऊबाई ही त्यांची एक दुर्बोध कविता आहे. पण तिच्याबद्दल ग्रेस म्हणतात, ''चिमणीच्या जाऊबाई ही माझी आवडती कविता पण तिच्यात एक गंमत आहे. पण मी ती सांगणार नाही''.[४] जर ग्रेस आपल्या कवितातील रहस्य अथवा गंमत रसिकांना सांगणार नसतील तर त्यातील अनुभूती संक्रमित होणार नाही. याची जाणीव ग्रेस यांना नक्कीच असणार पण स्वत:च्या काव्यातील दुर्बोधता ते एखाद्या दागिन्याप्रमाणे बेसरबिंदीप्रमाणे भूषण म्हणून जपतात.

ग्रेस यांच्या कवितेतील दुर्बोधता आणि त्यांचे भासपातळीवरील व प्रतिभापातळीवरील वास्तव्य पाहता ग्रेस हे अतिवास्तववादी वाटतात. अतिवास्तववादी (Surrealism) हा मानवी मनातील अगणित, अनाकलनीय भावजाणिवांना प्रभावीपणे व्यक्त करतो. यासाठी फ्रॉईडच्या मानसशास्त्राचा आधार घ्यावा लागतो. फ्रॉईडने मानवी अंतर्मनातील अनंत कानाकोपऱ्यावर प्रकाश टाकल्याने मानवाच्या वर्तनातील व्यक्तिसापेक्षता स्पष्ट झाली. त्यामुळे 'वास्तव' आणि स्वप्न Fantasies यांची संकल्पनाच बदलली. मानवाच्या मनात जे असते तेच खरे 'वास्तव' आणि बाह्य जगातील जे घडते त्याचा या मनातील वास्तवाशी काहीच संबंध नसतो असे फ्रॉईडने सिद्ध केल्याने व्यक्तिगतता आली. साहित्याची समाजाभिमुखता अतिवास्तववादाने अमान्य केली.

अतिवास्तववादाने प्रचलित आणि प्रतिष्ठित समाजव्यवस्था व प्रस्थापित जीवनमूल्य यांना नाकारले. वर्तनातील विक्षिप्तपणा, तुसडेपणा आणि परंपरागत जीवन धारणोला नकार ही अतिवास्तववादाची लक्षणे आहेत तर कल्पकता Imagination ही अतिवास्तववादी साहित्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. या संदर्भात बी. रंगराव म्हणतात, "अतिवास्तववादी कलावंत कल्पकतेच्या सोबतच फ्रॉईड, युंग आणि इतर मनोविश्लेषकांनी दर्शविलेल्या अंतर्मनातील मूलभूत भावविश्वात रममाण असतो. वैचारिकता आणि सभ्यता हा त्यांच्या मते माणसाचा दुर्गुण. (the pathetically rational man) 'ही विचार करणारी दुर्दैवी माणसं' अशा शब्दात अतिवास्तववाद्यांनी विचारवंतांची हेटाळणी केली आहे. मानवी अंतर्मनात वावरणाऱ्या सूक्ष्म भावविश्वाला व्यक्त करताना सर्व प्रकारची पारंपारिक बंधने अडचणीची वाटली म्हणून अतिवास्तववाद सतत प्रयोगशीलतेचा पुरस्कार करतो. अतिवास्तववादी कलावंत कलेला आपले आराध्य दैवत मानून तिच्यासाठी सर्वस्वाचा त्याग करण्याची तयारी ठेवतो. कलेसाठी समाज व तद्विषयक प्रथांची, संकेतांची तो पर्वा करीत नाही. स्वप्नामधील सत्य परमोच्च मानून बाह्यवास्तवतेला तो नाकारतो. अतिवास्तववाद स्वयंचलित लेखन (Automaticism) स्वीकारतो. नव्हे त्याद्वारे आविष्कृत होतो. अतिवास्तववादी कलावंत कोणत्यातरी अदृश्य शक्तीद्वारे मनातील सारे विचार, दडून राहिलेले आणि कोणत्या तरी कोपऱ्यात निपचित पडून राहिलेले विचार-भावभावना व त्याच्या व्यक्तिमत्वातील सारे गुणधर्म नकळतपणे शब्दरूपात व्यक्त करतो. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे हे शब्द आकृतीबंध असते. या आकृतीबंधात चित्र-विचित्र दृश्ये, भूतलाबाहेरील जगात वावरणारे जीव, जादू आणि तत्सम शक्तीचा भास आणि या माध्यमातून अनिवार्यपणे येणारे एकटेपण (alienation) ठळकपणे साकार होतात. अतिवास्तववादी कलाकृती म्हणजे सामान्यत: न समजणारी पण मानवी मनातील असंख्य भावलहरींना सांकेतिकपणे प्रकट करणारी रचना. त्या कलावंतामध्ये एकसंधपणा (solidarity) हा ही कधीच नव्हता. फ्रॉईडने सविस्तरपणे मांडलेले लैंगिकतेचे स्त्रोत (libido) हा त्यांचा आवडता विषय. साहजिकच त्याच्या कलाकृतीमध्ये लैंगिकतेचा भरणा अधिक होता. पारंपारिक नितिमूल्य अव्हेरून मानव आणि प्रकृतीच्या मुलभूत घटकांना निर्भयपणे व्यक्त करणे हाही अतिवास्तववादाचा एक उद्देश. यातूनच लैंगिक स्वातंत्र्याची कल्पना पुढे आली. अतिवास्तववाद्यांनी अंगिकारलेले एक सूत्र म्हणजे समाजासाठी कला नसून कलेसाठी समाज आहे हे होय.

मराठीतील ग्रेस, जी. ए. कुलकर्णी, सदानंद रेगे यांच्या साहित्यकृतींमध्ये अतिवास्तववादी घटक प्रामुख्याने आढळतात''.[५]

अतिवास्तववादाचे विवेचन करणारा एवढा दीर्घ उतारा देण्याचे कारण इतकेच की, अतिवास्तववादाची सगळी लक्षणे ग्रेस यांच्या कवितेला तंतोतंत लागू पडतात. ग्रेस यांच्या कवितेत मानवी मनाच्या अंतर्मनातील सूक्ष्म भावविश्व व्यक्त होते. ते व्यक्त करताना ग्रेस कोणतेही संकेत, प्रथा-रूढींचे बंधन, पारंपारिक विचाराधिष्ठित संकल्पना यांची तमा बाळगित नाहीत. त्यांच्या अंतर्यामातील चित्र-वैचित्र दृश्य, आभास आणि त्यांची परस्परात झालेली मिसळण, कल्पनातीत, तर्कातीत अनुभूती, प्राणी-पक्षी, जीवजंतू, अमानवी शक्ती, फकीर, अद्‌भूतता यांचे चित्र ग्रेस शब्दबद्ध करतात. ही सर्व लक्षणे सोदाहरण थोडक्यात देता येतील.

१) मनातील विचित्र दृश्ये - शुभ्र अस्थींचे धुके, आकाश पाठीवर सुजणे, लाटांचे देऊळ, शुभ्र फुलांची ज्वाला पेटणे, पण न उजळणे, शेंदरी देठांचे प्राजक्ती स्मशान. पांढरे हत्ती अंधारबनात जिथे थांबले होते ते वृक्ष पांढरे होणे इ. तसेच चिमणीच्या जाऊबाई, सुगंधी विनाश, अस्ता अस्तावर सूर्य उगवणे. इ.

२) एकसंधपणाचा अभाव - गेम्स यांची कविता कोणताही अनुभव एकसंधपणे मांडत नाही. तिच्यात कमालीचा तुटकपणा आहे. कवितेच्या पहिल्या ओळीचा किंवा ओळींचा पुढच्या ओळीशी काही तर्कबद्ध सुसंगत संबंध नसतो. विखुरलेल्या प्रतिमातून वाचकांना अनुभूतींचे काही तुकडे मिळत जातात. उदा. प्रारंभ, लाटांचे देऊळ, पांढरे हत्ती, मरण, आठवणी, गावातल्या आठवणी, काळा घोडेस्वार या ग्रेस यांच्या कविता.

उदाहणादाखल वरील काही कविताच केवळ अशा स्वरूपाच्या आहेत असे नाही तर ग्रेस त्यांच्या काही कवितांचा अपवाद वगळता जवळ जवळ सगळ्याच कविता अनुभवाचा एकसंधपणा देत नाहीत. प्रत्येक अनुभव वेगळा. ज्याप्रमाणे अनेक मोत्यांची माळ तयार होते. त्याप्रमाणे एकेक अनुभव एकापुढे एक मांडून ते सलगपणे सांगत जावे पण एकाचा दुसऱ्याशी संबंध नसावा. त्याचप्रमाणे ग्रेस यांची कविता अनुभवांच्या मोत्यांची सुंदर माळ तयार करते. ही कविता अलंकारासारखी आकर्षक बनते. यादृष्टीने कै. ज्ञानेश्वर विठ्ठल कुलकर्णी, सूर्य, कावळा, कावळे उडाले स्वामी, पिस्टस् अशा अनेकविध कविता अभ्यासनीय आहेत.

३) लैंगिकतेचे स्त्रोत - Libido अतिवास्तववादी कलावंताचा आवडता विषय म्हणजे लैंगिकता. हा या कवींच्या कलाकृतीत काठोकाठ भरलेला असतो. ग्रेस यांच्या कवितेतून तर लैंगिक देहजाणिवेचे संपृक्तपण स्पष्टपणे दिसून येते. ग्रेस यांच्या कवितेचा विषय कोणताही असो त्यातून शृंगाराचे सूचन होतेच. पारंपारिक नीतिमूल्ये झुगारून, कसलाही आडपडदा न ठेवता ग्रेस शरीर संगाचे शृंगाराचे वर्णन करतात. स्त्रीदेहाचे, संभोगाचे अखंड चिंतन त्यांच्या कवितेत आढळते. आई त्यांची प्रेयसी होऊ शकते. दीर-भावजय, मुलगी-बाप, संत-तरूणी, जोगीण-पुरूष यांचे अस्पष्ट शृंगारसूचन त्यांच्या काही कवितातून तसेच ललित निबंधातून होते. नग्न स्त्रीदेहाचे वर्णन तर अगणित वेळा येते. 'सांध्यपर्वातील वैष्णवी' या ग्रेस यांच्या काव्यसंग्रहात तर काही कवितातून ग्रेस इंद्रियांचे स्पष्ट उल्लेख करून प्रत्यक्ष कामक्रीडेचे वर्णन करतात. उदा.

या इथे तुटून पडलेल्या वाद्याशेजारी, फरशीवर सांडलेल्या
मदिरेच्या चिमूटभर, रत्नशूळ लकाकीत मी नागवी करतोय.
तुला . . . . तझ्या स्तनांची दाटून दाटून तटतटून आलेली माया मी
हाताने खुडत नाही, ओठांनी ओढत नाही . . . . वीज चमकावी
अंधारात, तशीच स्तनांवरून खाली ओघळणारी जीभ
दिसत मला . . . . आणि मग मी, अतृप्त आदिम, जखमी
श्वापदाप्रमाणे तुझे जननेंद्रिय खूप खोलपर्यंत जीभेने
चाटून काढतो.

('सांध्यपर्वातील वैष्णवी', पृष्ठ १८६).

ग्रेस यांच्या 'सांध्यपर्वातील वैष्णवी' काव्यसंग्रहातील आणि 'संध्यानग्न पुरूषाची लक्षणे' या ललित निबंधातून लैंगिक स्वातंत्र्याचा परिपाक दिसून येतो. इतकेच काय पण जोगीण, हडळ, नाग-नागीण यांच्याही शृंगाराचे सूचन काही कवितातून व ललितनिबंधातून येते.

४) सामाजिकतेचा अभाव - अतिवास्तववादी कलावंत सामाजिक संकेतांची रूढी-परंपरांची, सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवत नाही. ग्रेस यांच्या बाबतीतही तेच म्हणावे लागेल. ग्रेस यांच्या कवितेत समाजाचा आणि सामाजिकतेचा अभाव आहे. त्यांच्या कवितेत युद्धाचे उल्लेख आले तरी त्यातील दु:ख जाणीव व्यक्तिगत पातळीवरच असते.

त्याला सामाजिक वैचारिकतेचा स्पर्श नसतो. याशिवाय समाज, देशप्रेम, देशनिष्ठा, सामाजिक बांधिलकी, विश्वातील सामाजिक, आर्थिक घडामोडी यांचा दूरान्वयानेही संबंध त्यांच्या लेखनात नाही. याबाबतच्या आरोपाला स्पष्टीकरण देताना ग्रेस म्हणतात, ''मला समाजाचे अगत्य आहे. मला तो हवा आहे पण माझ्या सौंदर्यव्यवस्थेमध्ये बसणारा समाज मला हवा आहे''.[६]

ग्रेस यांच्या या स्पष्टीकरणातून त्यांची प्रस्थापित तत्वाधिष्ठित सामाजिक विचारांची जाणीव दिसून येत नाहीच. उलट एकटे ग्रेस संपूर्ण अनंत समाजालाच स्वत:च्या व्याख्येनुसार बदलायला सांगताहेत. ग्रेस यांच्या या उद्‌गारातूनही अतिवास्तववाद Surrealism च दिसून येतो.

५) स्वयंभूपणाचा विचार - 'ख्रिस्तकरूणा' हे ग्रेस यांच्या लेखनातून येणारे मूल्य दिसते. त्यातही त्यांचा व्यक्तिगत भावच दिसून येतो. त्यात वैश्विकता येत नाही. यासंदर्भात बी. रंगनाथ म्हणतात, ''गेंजेनबक यांच्या मते अतिवास्तववाद व ख्रिस्तवाद यांची सांगड घालणे योग्य कारण ख्रिस्ताप्रमाणे अतिवास्तववादी कलावंतही स्वयंभू आणि स्वयंपूर्ण आहेत. अतिवास्तववादाच्या पुरस्कर्त्यांनी अनेकदा स्वत:ला कवी-लेखकांपासून वेगळे समजून संपूर्ण जगाच्या मुक्तीची कास धरणारे संत आणि तत्वज्ञ समजले''.[७]

ग्रेस स्वत:ला अनुवंशहीन म्हणवून घेण्यामागे अतिवास्तववादाचे हे तत्वही असू शकते. त्यांच्या कवितेतून ललित निबंधातून येणारी 'ख्रिस्तकरूणा' गेंजेनबक याच्या वरील मताशी जुळणारी वाटते. शिवाय ग्रेस हे स्वत:ला इतरांपेक्षा वेगळे समजतात. माझी कविता कुणासारखीच नाही. मी इतर कवी-लेखकांपेक्षा वेगळ्या स्वरूपाची कविता लिहितो.

ग्लानीत भास माझे झाले विदग्ध सत्य
आई तुझ्या मुलातील हा एवढाच संत.

असे म्हणणारे ग्रेस स्वत:ला संत-महंत ही पदवी बहाल करतात. संतत्वाच्या, थोरपणाच्या संकल्पना स्वत:च स्वत:ला लागू करणे हे ही अतिवास्तववादाच्या तत्वाशी साम्य दर्शविते.

६) मानसशास्त्रीय सिद्धांताचा विचार - फ्रॉईडने सांगितलेले इड, इगो, सुपर इगो हे मनाचे वर्गीकरण आणि अंतर्मनातील भाव आंदोलने ग्रेस यांच्या कवितेत दिसतात. त्यांच्या

कवितेतील प्रतिमा आणि कल्पनारम्यता यातून निर्माण होणारी अनुभूती आणि त्यांची संगती ग्रेस शिवाय इतर कुणालाही लावणे शक्य नाही. म्हणूनच ग्रेस यांच्या काव्यनिर्मितीच्या प्रदेशाला ते 'चंद्रमाधवीचे प्रदेश' असे म्हणत असावेत.

संध्याकाळी जिथे प्रकाशाचा मृत्यू होतो आणि धूसरतेत काहीच स्पष्टपणे दिसत नाही. अंधाराचे भय, प्रकाशाच्या मृत्यूचे भय या दोन्ही तणावाखाली कवीला होणारे कातर, भयावह भास यातूनच ग्रेस यांच्या कवितेची निर्मिती होत त्याची 'चंद्रमाधवीचे प्रदेश' ही कविता या संदर्भात उल्लेखनीय ठरावी.

चंद्रमाधवीच्या प्रदेशातून 'ती' जाताना सगळे फुलांचे शेजार आणि तुझी सारी निमित्ते या प्रदेशाच्या काठाला असलेल्या माझ्या घोड्याच्या समाधीपाशी अंतर्धान पावलीत.

चंद्रमाधवीच्या प्रदेशात झाडांची मग्नमहान निर्मनुष्यता, एकांत वाढवणारे फुलांचे संघ, पोरक्या दंतकथेतून झरणारे चांदणे आणि मोत्यांनी सजू नयेत अशी जाळीदार सरणे आहेत.

चंद्रमाधवीच्या प्रदेशातील निर्झरी वाटांनी तिची पैंजणे दुखावलीत आणि तिच्या अरण्यमधुर डोळ्यातून राऊळाचे उत्पात कोसळलेत. राहिलेल्यांचे धुके आभाळात मिसळून गेले.

चंद्रमाधवीचे प्रदेश म्हणजे कस्तुरी-मोगऱ्याच्या सुगंधी विनाशाचा प्रदेश. तिथे अभिशापाने तप्त झालेल्या कांचनासारखी संध्यामाया आहे. आणि तिथूनच कवीची सर्व मूक सत्ये आणि चंदनाचे साग उगवतात.

चंद्रमाधवीच्या प्रदेशात विराट संध्याकाळ थांबलेली आहे. आणि त्या संध्याकाळच्याच एका तुकड्याच्या पाताळात कवीचे हृदयभर दु:ख निजले आहे. आणि त्या त्या दु:खाचा वाटा त्याने उचलला आहे.

कवीच्या अंतर्मनातील काव्यनिर्मितीचा प्रदेश कवीने इथे वर्णन केला आहे.

मानसशास्त्रज्ञ 'युंग' यानेही फ्रॉईडच्या मनोविश्लेषणात्मक सिद्धांतांना व संकल्पनांना वैयक्तिक पातळीवरून वैश्विक पातळीवर नेले.

कलेक्टिव्ह अॅनूकॉन्शस, अॅनिमा अॅनिमस म्हणजे अनुक्रमे सामूहिक अंतर्मन, पुरूषाच्या मनातील स्त्री प्रतिमा, स्त्रीच्या मनातील पुरूष प्रतिमा हे युंगचे मनोविश्लेषणात्मक सिद्धांतही ग्रेस यांच्या कवितेला लागू पडतात. ग्रेस यांच्या कवितेचे आकलन करून घेण्यास मदत करतात. याबाबत डॉ. नंदकुमार मुलमुले म्हणतात, ''कलेक्टिव्ह अनूकॉन्शस सामूहिक अंतर्मनाचा शोध घेताना अनेक आदिम प्रतिमा ग्रेसला दिसतात. त्या कधी बिनचेहऱ्याच्या, कधी विविध रूपे घेऊन येतात. 'राजपुत्र आणि डार्लिंग' मधल्या पहाडी स्त्रिया याच प्राचीन मनाचे अवशेष आहेत.

''पहाडी स्त्रियांची एकमेव खूण
ठाऊक आहे तुला डार्लिंग ?
चेहरे नसतात त्यांना
. . . . .
कोणत्यातरी ध्रुवावर खरोखरच सापडेल
का मला पहाडी स्त्रियांचे मूलस्थान ?''

या पहाडी स्त्रियांचे गर्भाशय उलटे आहे. कारण ग्रेसच्या प्रतिभेचा जन्मच होतो उलट प्रवास करण्यासाठी. बाह्य जगात येण्याऐवजी अजून खोल जाण्यासाठी.

अॅनिमा आणि अॅनिमस प्रत्येक पुरूषाच्या मनात एक स्त्री प्रतिमेचा कोपरा आहे. त्याला युग 'अॅनिमा' म्हणतो. तसेच स्त्रीच्या मनातही पुरूष प्रतिमेचा भाग आहे ज्याला तो अनिमस म्हणतो. स्त्री प्रतिमेचा प्रत्यय ग्रेसच्या कवितेत उर्मिला, सखी, आई, जाऊबाई अशा अनेक संकल्पनातून जागोजागी आढळतो. उर्मिलेच्या मूक वेदनेचे तर ग्रेसला अनिवार आकर्षण आहे.

''आज दु:खाला लागली
भोळ्या उर्मिलेची ठेच
भग्न शब्दांच्या ओठात
रित्या आशयाचा घोट.''

कार्ल युंगच्या तत्वानुसार आपल्या मनातील स्त्री-प्रतिमांची ओळख पटवून घेणे, तिचा स्विकार करणे आणि तिला स्वत:च्या व्यक्तिमत्वात सामावून घेणे ही

परिपक्वतेची अखेरची पायरी आहे. या दृष्टीने ''स्त्रीत्वाचा साक्षात्कार होणे हेच खरे पुरूषार्थाचे लक्षण आहे. हे ग्रेसचे वाक्य मनाला भावल्याशिवाय रहात नाही''.[८]

स्वत:मधील स्त्रीत्वाचा शोध ग्रेस यांच्या शृंगारविषयक कवितातूनही येतो.

मी पुरूष असतानाही
तू केस उदविले माझे
(सांध्यपर्वातील वैष्णवी, जीवाची वैष्णवी, पृष्ठ १७).

संध्येतील कमलफुलासम मी नटलो शृंगाराने
देहाच्या भवती रिंगण घालती निळाई राने.
(चं. प्र., 'निष्पर्ण तरूंची राई', पृष्ठ ११४).

याशिवाय 'तळपाय', 'रंग' यासारख्या कवितांतूनही ग्रेस यांनी स्वत:मधील स्त्रीत्वाचा शोध घेतल्याचे जाणवते. ग्रेस म्हणतात, उखाणे आणि कोडीही मीच लिहू शकतो. एखाद्या स्त्रीलाही आपल्या स्त्रीत्वाचा संकोच वाटावा अशी उखाणे आणि शब्दकोड्याप्रमाणेच अस्सल बाईलाही कृतार्थ झाल्यासारखे वाटेल इतकी गुणसंपन्न फेमिनाईन पोएट्री मीच लिहिली आहे.[९]

या कवितांतून आणि उद्गारावरून ग्रेस यांच्यातील ॲनिमा सिद्धांताचे स्पष्ट पुरावे मिळतात. ग्रेस हे अतिवास्तववादी असले तरी सौंदर्यवादाच्या खुणाही त्यांच्या काव्यलेखनात दिसतात. त्यावर याच प्रबंधात मागे विश्लेषण झाले आहे.

कोणी नाही कोणी नाही
नाही कुणी बाई
काळोखातुन मला सारखे
कोण वळुन पाही ?
(चं. प्र., 'सनई', पृष्ठ २७).

यासारख्या ओळी तर

कुणी नाही गं कुणि नाही
शांति दाटली चोहिकडे
लाजत लाजत
खेळ गडे खेळू काही

या बालकवींच्या ओळींची आठवण करून देतात. म्हणून सौंदर्यवादी ठरतात. या संदर्भात बी. रंगराव म्हणतात, ''विदर्भातील कवी ग्रेस हा रोमँटिक की आधुनिकतावादी हा संभ्रम अनेकदा पडतो. पण तो आपल्या कवितामधून या दोन्ही वादाचा सहजपणे अविष्कार करतो''.[१०]

ग्रेस यांच्या कविता रसिकांना आवडतात पण समजतात किती ? हा ही प्रश्न त्यांच्या कवितेबाबत उपस्थित होतो. ग्रेस यांची शब्दमोहिनी, शब्दलाघव थक्क करणारे आहे. त्यांना शब्दशक्तीची समज, शब्दार्थांची आणि नादाची जाण विलक्षण आहे. ही जाण मराठी काव्यक्षेत्रात अत्यंत दर्जेदार, श्रेष्ठ आणि अपवादात्मक आहे. त्यांची शब्दकळा लोभस, अस्सल देशी, भारतीय संस्कृतीचे जतन करणारी आहे. त्यांच्या भाषेविषयी डॉ. अक्षयकुमार काळे म्हणतात, ''ग्रेस यांना अगदी सुरवातीपासूनच शब्दशक्तीची विलक्षण समज आहे व ती या नक्षीकामाकरिता अतिशय उपयोगी पडली आहे. शब्दाच्या अर्थाची आणि नादाची इतकी खोल समज असणारा कवी विरळा. शब्दांच्या अचूक निवडीत त्यांच्या प्रतिभेचे मर्म आहे''.[११]

ग्रेस यांच्या भाषेला नादमयता आहे. संगीताचे इतके आकर्षण असणारी शब्दकळा सध्या तरी मराठी कवितेत ग्रेस यांच्याशिवाय कुणाकडेही नाही, असे धाडसाने म्हणावे लागेल. ग्रेस यांनी मराठीला काय दिले ? असा प्रश्न निर्माण झाला तर असे म्हणता येईल की,

- ग्रेस यांनी मराठीला लावण्यवती शब्दकळा दिली.
- ग्रेस यांनी मराठीमध्ये काव्यनिर्मिती विषयी अनेक प्रश्न उपस्थित केले. समीक्षेमध्ये अनेक प्रश्न निर्माण केले.
- ग्रेस यांनी आपल्या मराठी कवितेतून स्त्री-पुरूष या सनातन नात्याचा शोध अत्यंत वेगळ्या धर्तीवर, वेगळ्या दिशेने आणि वेगळ्या परिमाणांच्या साह्याने घेतला.

ग्रेस यांच्या कवितेने मराठीला काय दिले या प्रश्नाला ग्रेस यांनीच उत्तर दिले आहे ते असे- ''माझ्या कवितेने मराठीला काय दिले व ती काय देत आहे. याचा विचार मला स्वत:ला करण्याचे अजिबात कारण नाही. पण माझ्या कवितेने मराठी काव्यात निर्मितीची प्रक्रिया, त्यातून सिद्ध झालेली कलाकृती व तिचा आस्वाद या त्रिवेणीसंबंधी अनेक महत्वाचे प्रश्न निर्माण केले आहेत''.[१२]

अत्यंत उत्कटल, तरल, भावुक, संमिश्र अनुभूती ग्रेस देतात. त्या अनुभवाचे स्पष्टीकरणात्मक शब्द न देता, जशी दिसली तशी कविता लिहितात आणि ती दुर्बोध होते. त्याबद्दलही या प्रबंधात इतरत्र सविस्तर विवेचन आले आहेच. त्यांच्या कवितेकडे साहित्यशरण वृत्तीने पहावे असे ते सांगतात. ते म्हणतात, ''साहित्यशरण वृत्तीने कुठल्याही अनवट कलाकृतीकडे गेले की मग संभोगासाठी तिला विवस्त्र करण्याची प्रियकराला गरज भासत नाही तिच्या अंगावरची सर्व वस्त्रे आपोआप गळून पडतात''.[१३]

ग्रेस आपल्या कवितेतील दुर्बोधतेबद्दलही स्पष्टीकरण देताना म्हणतात, ''या माझ्या शब्दमयी, शब्दवेल्हाळ, आणि अर्थकाहूर कवितेवर दुर्बोधतेचा आरोप केला जातो, त्या आरोपाचे मी निराकरण करीत नाही. त्याचे कारण कलावंत म्हणून, जरी मला ठाऊक असले तरी कुमारिकेची ही बेसरबिंदी कुठल्याही प्रियाळ समीक्षकाला, वाचकाला मी देणार नाही. खरे तर माझ्या कवितांच्या शब्दविसर्जनाच्या प्रदेशात ही दुर्बोधतेची बेसरबिंदी मी अनेक ठिकाणी दडवून ठेवली आहे, ती चोरीचा माल म्हणून नव्हे, तर रहस्यशरणाचे दैवी गुपित म्हणून !''[१४]

स्वत:च्या कवितेवरील दुर्बोधतेचा आरोप खोडून न काढण्यामागे कवीची भूमिका काय असावी ? या प्रश्नाचे उत्तर ग्रेसच देऊ शकतील.

स्वत:ची काव्यनिर्मिती म्हणजे लघुमरण आहे. त्यांची काव्यनिर्मितीच त्यांचा Defence, त्यांचे Real Identification आहे. त्यांच्या कवितेने त्यांचे विश्वातील स्थान निश्चित केले आहे. असे ग्रेस सांगतात.

ग्रेस यांच्या कवितेतून, भय आणि दु:खजाणीव झिरपत असते. आपल्या सांध्यपर्व या ध्वनीचित्रफीतीत ते म्हणेतात, ''माझ्या संपूर्ण भावविश्वाला 'स्मृतीउदासीने' ग्रासले आहे. हा पोळल्या फुलातला गंध आहे. याला मी इंग्रजी शब्दात 'नॉस्टाल्जिया' म्हणेन. या माझ्या 'नॉस्टाल्जियाला' मधोमध धरणारी दोन टोके आहेत. पहिले टोक आहे 'सतेज निर्मितीशीलता आणि दुसरे टोक आहे एकांतात वाटणारे निर्मिती नाशाचे भय''.[१५]

ग्रेस यांच्याविषयी चर्चा करताना कमल देसाई म्हणाल्या होत्या, ''वाङ्मयाचा हेतू व परिणाम ज्ञानात्मक असावा. ग्रेस यांच्या कवितेत तो मुळीच नाही. त्यांच्या कविता केवळ भावात्मक अनुभव देतात''.

# सारांश

या प्रकरणात आपण ग्रेस यांच्या वाङ्मय परंपरेचा, काव्यजाणिवेचा आणि वाङ्मय प्रवासाचा अभ्यास केला. ग्रेस हे कमालीचे आत्ममग्न कवी असल्याने त्यांची कविता ही आत्मलीन, आत्मकेंद्रीच आहे. ती त्यांच्या एकट्याच्याच भावविश्वाच्या वर्तुळात फिरत आहे. त्यामुळे त्यांच्या कवितांचा विशिष्ट प्रवास निर्देशित करता येत नाही. स्वत:च्या कवितेचे 'अनुवंशहीन' कविता असे वर्णन करतानाच ते 'आपल्या सहोदराची' संकल्पना मांडतात.

ग्रेस स्वत:ला कोणत्याही संप्रदायाचे अथवा वृत्तीचे (उदा. अभिजात, सौंदर्यवाद इत्यादी) मानत नाहीत हे आपण पाहिले तरीही त्यांच्या 'संध्याकाळच्या कविता' आणि 'चंद्रमाधवीचे प्रदेश' या दोन काव्यसंग्रहांच्या अभ्यासातून आपणास असे लक्षात आले की, ग्रेस हे सौंदर्यवादी कवी आहेत. पण तरीही त्यांची संपूर्णत: वृत्ती सौंदर्यवादी नसून ते बव्हंशी अतिवास्तववादी (Surrealism) किंवा आधुनिकतावादी कवी आहेत. ग्रेस यांचा संप्रदाय निश्चित करताना आपण सौंदर्यवादाची आणि अतिवास्तववादाची लक्षणे लक्षात घेऊन ग्रेस यांच्या कवितांचा सोदाहरण अभ्यास केला आहे.

या प्रकरणात आपण ग्रेस यांच्या कवितेचे यश आणि सामर्थ्य यांचा थोडक्यात विचार केला आहे. ग्रेस यांच्या कवितांच्या मर्यादांचा उल्लेख करून आता आपण काही निष्कर्षाप्रत आलो आहोत.

ग्रेस यांच्या कवितेचे निष्कर्ष मांडण्यापूर्वी आपण या सहाही प्रकरणांचा थोडक्यात आढावा घेऊन उपसंहार करणार आहोत.

# संदर्भसूची


१) ग्रेस : ग्रेस : मुलाखत, 'एकांत आणि एकाकीपणा हा माझ्या निर्मिती प्रक्रियेचा स्वभाव', डॉ. अक्षयकुमार काळे यांनी ग्रेस यांची घेतलेली मुलाखत, समाविष्ट ग्रंथ, ग्रंथमाला खंड एक पृष्ठ १०९.

२) त्र्यं. वि. सरदेशमुख : 'धुके आणि शिल्प', पृष्ठ १०३.

३) ग्रेस : 'मितवा', पृष्ठ १३९.

४) ग्रेस : 'ग्रेस : एक वाङ्मयीन सहजसंवाद', प्रा. चं. वि. जोशी यांनी घेतलेली ग्रेस यांची मुलाखत, समाविष्ट ग्रंथ, 'त्रैमासिक अनुबंध', पृष्ठ ३१.

५) बी. रंगराव : समाविष्ट ग्रंथ, 'समीक्षेतील नव्या संकल्पना', संपादक : मनोहर जाधव, पृष्ठ ५६, ५७, ६०.

६) ग्रेस : 'सांध्यपर्व' ध्वनीचित्रफीत, 'कवी ग्रेस यांचे मुक्त चिंतन : स्वत:च्या कवितेविषयी'.

७) बी. रंगराव : समाविष्ट ग्रंथ, 'समीक्षेतील नव्या संकल्पना', संपादक : मनोहर जाधव, पृष्ठ ५८.

८) डॉ. नंदकुमार मुलमुले : 'रचनेच्या खोल तळाशी', समाविष्ट ग्रंथ, द्वैमासिक कवितारती, अंक ५ वा, संपादक : पुरूषोत्तम पाटील, पृष्ठ १८, १९.

९) ग्रेस : ग्रेस : मुलाखत, 'एकांत आणि एकाकीपणा हा माझ्या निर्मिती प्रक्रियेचा स्वभाव', डॉ. अक्षयकुमार काळे यांनी ग्रेस यांची घेतलेली मुलाखत, समाविष्ट ग्रंथ, ग्रंथमाला खंड एक पृष्ठ १०९.

१०) बी. रंगराव : समाविष्ट ग्रंथ, 'समीक्षेतील नव्या संकल्पना', संपादक : मनोहर जाधव, पृष्ठ ५५.

११) अक्षयकुमार काळे : 'अर्वाचीन मराठी काव्य दर्शन', पृष्ठ ५९०.

१२) ग्रेस : 'मितवा', पृष्ठ १९८.

१३) ग्रेस : 'तत्रैव', पृष्ठ २०१.

१४) ग्रेस : 'तत्रैव', पृष्ठ १९८.

१५) ग्रेस : 'सांध्यपर्व' ध्वनीचित्रफीत, 'कवी ग्रेस यांचे मुक्तचिंतन : स्वतःच्या कवितेविषयी'.

****